# मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई.

संदर्भः १) माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. बी (जन)५६०१/५७/२०१८ /१३८९ दिनांक १९.११.२०१८.

२) माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. बी (जन)५६०१/५७/२०२० /६९०, दिनांक १० सप्टेंबर, २०२०.

## कार्यालयीन आदेश

(क्र.आस्था१६/१२४५/२०२१ दिनांक १०.०८.२०२१)

मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई या कार्यालयाच्या निवड समितीने **'शिपाई/हमाल'** या पदासाठी निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीला माननीय उच्च न्यायालयाने वरील संदर्भांकित पत्र क्र. १ अन्वये मंजूरी दिलेली आहे व संदर्भांकित पत्र क्र. २ अन्वये सदर निवड/प्रतिक्षा सूचीस पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई हे या कार्यालयातील **'शिपाई/हमाल'** या पदाच्या रिक्त पदांसाठी निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार अनु. क्र. ५८ ते अनु. क्र. ६१ यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करीत आहेत. उपरोक्त उमेदवाराची वेतननिश्चिती सातव्या आयोगाच्या शिफारसीनुसार **रु. १५,००० - ४७,६०० (एस-१),** या वेतनश्रेणीमध्ये करण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा करण्यात येईल.

निवड/प्रतिक्षा यादीतील खालील नमुद उमेदवार अनु. क्र. ५८ ते अनु. क्र. ६१ यांनी या कार्यालयात **दिनांक १७.०८.२०२१** (मध्यान्हपूर्व) रोजी हजर रहावे.

| अनु .क्र. | उमेदवाराचे नाव व आसन क्रमांक | निवड/प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र जयवंत ढेकळे (आसन क्र. S-190/P-719) | ५८ | रा. वाखरी, ता. फलटण, जिल्हा - सातारा, पिन क्र. ४१५५२३. |
| | | | ..०२.. |

| अनु .क्र. | उमेदवाराचे नाव व आसन क्रमांक | निवड/प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| २ | श्री. धोंडीबा मारोती शिदने (आसन क्र. S-113/P-473) | ५९ | रा. कापसी बु. कापसी, ता. लोहा, जिल्हा - नांदेड, पिन क्र. ४३१६०२. |
| ३ | श्री. निखिल शालिकराम भोलाणे (आसन क्र. S-48/P-205) | ६० | रा. १९६ नेताजी रोड, नेताजी चौक, धरणगांव, जि. जळगांव पिन क्र. ४२५१०५. |
| ४ | श्री. प्रशांत दत्तात्रय पिसाळ (आसन क्र. S-62/P-265) | ६१ | रा. हनुमानसिंग राजपुत नगर, जय बाबाजी चौक, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगांव पिन क्र. ४२४१०१. |

१) उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही अस्थायी स्वरुपाची असेल.

२) उपरोक्त उमेदवारांनी कामावर रूजू होतांना मुळ शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या साक्षांकित प्रती, सदर परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) व पॅन कार्ड/आधार कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स (यापैकी एक) सादर करावे.

३) उमेदवारांना कामावर रुजू झाल्यानंतर सदर कार्यालयीन आदेशातील अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल.

४) उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य असेल.

५) उमेदवारांनी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

६) उपरोक्त उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४,

..०३..

दिनांक ३१.१०.२००५, अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७.०७.२००७ व त्यानंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार नुसार नवीन 'परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना-D.C.P.S. आणि तद्नंतर शासन निर्णय, वित्त विभागअंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २७.०८.२०१४ आणि अंनियो-२०१५/ (NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४ दिनांक ०६.०४.२०१५ नुसार, परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे नामकरण "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना" NPS असे करण्यात आले असुन, सदर योजना यापुढे लागू राहील.

७) माननीय उच्च न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशानुसार उमेदवारांना आंतरजिल्हा बदली अर्ज, या कार्यालयात दोन वर्षाची सेवा पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही.

८) उमेदवाराची सेवा निवड/प्रतिक्षा यादीनुसार त्यांची सेवा ज्येष्ठता राहील, परंतु उमेदवार विहीत वेळेत सेवेत रुजू न झाल्यास त्याचा त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर परिणाम होईल.

९) उपरोक्त उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दिलेली माहिती आणि जोडलेली शैक्षणिक व इतर प्रमाणपत्र चुकीची आढळल्यास त्यांना त्वरित सेवेतून कमी करण्यात येईल.

१०) उपरोक्त उमेदवारांची सेवा ही महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नियमाधीन असेल.

११) उपरोक्त उमेदवारांस असे कळविण्यात येते की, त्यांनी **कार्यालयीन अधीक्षक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, आस्थापना विभाग, तिसरा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे वरील नमुद तारखेस सकाळी ठिक १०.३० वाजता न चुकता हजर रहावे. हजर न झाल्यास सदर उमेदवाराचे नांव निवड/प्रतिक्षा यादीतून कमी करण्यात येईल, याबाबतची नोंद घ्यावी.

..०४..

१२) उपरोक्त उमेदवारांस प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

(श्रीमती. सायली ते. दंडे)
प्रभारी मुख्य महानगर दंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

प्रत माहितीकरता :

१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२. प्रबंधक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई.
३. उपप्रबंधक/कार्यालयीन अधीक्षक, एस्प्लनेड, मुंबई.
४. मुख्य लिपिक, एस्प्लनेड, मुंबई.
५. गोपनीय विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
६. वेतन आणि रजा व सेवापुस्तक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
७. भविष्य निर्वाह निधी/निवृत्ती वेतन विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
८. सेवार्थ विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
९. रोख विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
१०. संगणक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
११. कार्यालयीन आदेश फाईल, एस्प्लनेड, मुंबई.
१२. संबंधित उमेदवार.